कॉपी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जळगाव  **P.S.(ठाणे):** रामानंद  **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0302  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/10/2021 12:59 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार  **Date From (दिनांक पासून):** 11/10/2021

**Date To ( दिनांक पर्यंत):** 11/10/2021

**Time Period (कालावधी):** पहर 5  **Time From (वेळेपासून):** 13:24 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:43 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/10/2021  **Time (वेळ):** 12:20 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 017  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/10/2021 12:39 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** उप प्रादेशिक परिवहन कार्यालय ,जळगाव

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** गणेश कौतीकराव ढेंगे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1962  **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लॉट नं 48,अनुराग स्टेट बँक कॉलनी जळगाव,जळगाव,रामानंद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लॉट नं 48,अनुराग स्टेट बँक कॉलनी जळगाव,जळगाव,रामानंद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रशांत जगन्नाथ भोळे उर्फ पप्पु भोळे | | - | 1. जामनेर रोड,जेके मोटार ड्रायव्हींग स्कुल, भुसावळ ता भुसावळ जि जळगाव ,भुसावळ,भुसावळ बाजारपेठ, जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादीः- गणेश कौतीकराव ढेंगे वय 59 धंदा वाहन प्रतिनिधी रा. प्लॉट नं 48 अनुराग स्टेट बँक कॉलनी जळगाव मो 9699611143आरोपीः-खाजगी व्यक्ती प्रशांत जगन्नाथ भोळे उर्फ पप्पु भोळे रा. जे.के. मोटार ड्रायव्हींग स्कुल जामनेर रोड भुसावळ जि जळगाव अप.घ.ता.वेळ ठिकाणः- दि 11/10/2021 रोजी 13:24 ते 13:43 वाजेचे दरम्यान उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे आवारात जळगाव खुलासाः- फि।। ची फि।। की वरील तारखेस वेळी व ठिकाणी यातील वरील आरोपी मज। यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. 11/10/2021 रोजी जळगाव उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या आवारात झालेल्या लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान खाजगी व्यक्ती प्रशांत जगन्नाथ भोळे उर्फ पप्पु भोळे रा. जे.के. मोटार ड्रायव्हींग स्कुल जामनेर रोड भुसावळ जि जळगाव यांनी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय जळगाव येथील अधिकारी व कर्मचारी यांची सही घेउन MH 19 CC 7700 या अॅक्टीव्हा गाडीचे वाहन हस्तातरणाचे काम करुन देण्याकरीता त्यांचेकडुन दि 11/10/2021रोजी 13:24 ते 13:43 वाजेचे दरम्यान पंच साक्षीदार यांचेसमक्ष 200 रु लाचेची रक्कम मागणी करुन मिळविण्याचा प्रयत्न केला यावरुन त्यांनी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने फि।। यांचेवर उपप्रादेशिक परिवहन कार्यालय जळगाव कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे ओळखीचा प्रभाव पाडुन पैशांच्या स्वरुपात लाभ मिळविण्याची व्यवस्था करुन गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केले म्हणुन गुन्हा.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): vijay fakirrao shinde(I (Inspector)) / POBN73044 **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा): -

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): vijay fakirrao shinde
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN73044

फिर्याद

रामानंद नगर पोलीस स्टेशन, जळगाव
दिनांक - २६/१०/२०२१

माझे नांव गणेश कौतीकराव ढेंगे, वय- ५९ वर्षे, धंदा- वाहन प्रतिनिधी, राहणार - प्लॉट नंबर ४८, अनुराग स्टेट बँक कॉलणी, जळगाव मो.नं ९६९९६११९४३.

समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी वरील नमुद ठिकाणी कुटूंबासह राहण्यास असून जळगाव उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ॲथोरीटी लेटर घेवून वाहन मालकाचा प्रतिनिधी म्हणून कामे करतो. मी वाहन क्र. एमएच १९ सीसी ७७०० या ॲक्टीव्हा गाडीचे वाहन हस्तांतरण करण्यासाठी वाहन घेणारे मालक श्री.जितेंद्र सोनार यांचा प्रतिनिधी म्हणून वाहन हस्तांतरणाचे शासकीय शुल्क रू ४००/- भरल्यानंतर कागदपत्रे दाखल करण्यासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,जळगाव येथे दि.०६/१०/२०२१ रोजी गेलो होतो. त्यावेळी उप प्रादेशिक प्ररिवहन अधिकारी यांचे खाजगी व्यक्ती प्रशांत भोळे (उर्फे पप्पु भोळे) याने वाहन हस्तांतरण करण्यासाठी अधिकारी यांच्या सहयांचे ३००/- रू. दयावे लागतील व संबधित कर्मचाऱ्यांचे सुद्धा पैसे दयावे लागतील तेव्हाच तुमचे काम होईल असे मला सांगितले. प्रशांत भोळे उर्फ पप्पु भोळे हा मागत असलेले पैसे हे शासकीय शुल्काच्या व्यतिरिक्त असून ते पैसे लाच म्हणुन मागत असल्याची माझी खात्री झाल्याने त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई होण्यासाठी मी दि.०८/१०/२०२१ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक येथे सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री.संदिप साळुंखे साहेब यांची समक्ष भेट घेवून आरटीओ जळगाव येथील अधिकारी व कर्मचारी आणि त्यांचे खाजगी व्यक्ती पप्पु भोळे यांचे विरूध्द लाचेची तक्रार असल्याचे व दि.११/१०/२०२१ रोजी मी त्यांची उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगाव येथे भेट घेणार असले बाबत तोंडी कळविले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.साळुंखे साहेबांना मी सांगीतले की, मी दि.११/१०/२०२१ रोजी ओंकारेशवर मंदिर परिसर, जयनगर, जळगाव जिल्हा जळगाव येथे येवून थांबेल तेथे आपण भेटू.

त्याप्रमाणे दि.११/१०/२०२१ रोजी मी ओंकारेशवर मंदिर परिसर, जयनगर, जळगाव येथे थांबलेलो असतांना पोलीस निरीक्षक श्री.साळुंखे साहेब हे तवेरा वाहनाने दोन पंच व सापळा पथकासह आले. तेथे त्यांचेत व माझेत परिचय झाला. त्यानंतर मी आरटीओ जळगाव येथील अधिकारी व कर्मचारी आणि त्यांचे खाजगी व्यक्ती प्रशांत भोळे उर्फ पप्पु भोळे यांचे विरूध्द लाचेची तक्रार माझे स्वतःचे हस्ताक्षरात लिहून दिली त्यावर मी सही केल्यानंतर श्री.साळुंखे साहेब व पंचानी सहया केल्या.

त्यानंतर मी माझे तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे आरटीओ जळगाव येथील अधिकारी व कर्मचारी आणि त्यांचे खाजगी व्यक्ती प्रशांत भोळे उर्फ पप्पु भोळे हे खरोखरच माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करण्याकरीता पोनि.श्री.साळुंखे साहेब यांनी मला व पंच श्री.रविंद्र जाधव यांना योग्य त्या सुचना देवून व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून देवून माझे शर्टचे आतील बनियानला एका कापडी पाऊच मध्ये ठेवुन ते एक सेफटी पिनव्दारे अडकविले. त्यानंतर मला व पंच श्री.जाधव यांना खाजगी व्यक्ती प्रशांत भोळे उर्फ पप्पु भोळे यांचे भेटीकरीता उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगाव येथे माझे कडे असलेल्या वाहन क्र. एमएच १९ सीसी ७७०० या ॲक्टीव्हा स्कुटर वरून रवाना केले. त्यावेळी पोनि.श्री.साळुंखे साहेब, सापळा पथकातील सदस्य व पंच श्री.नागरे असे ओंकारेशवर मंदिर परिसर, जयनगर, जळगाव येथे थांबुन होते.

त्यानंतर मी व पंच श्री.जाधव असे ओंकारेशवर मंदिर येथुन निघुन माझेकडे असलेल्या स्कुटरने उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगाव चे आवारात पोहोचलो. तेथे परिसरात स्कुटर उभी करून आम्ही खाली उतरलो व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,जळगाव इमारतीच्या आवारात २ नंबर लिहीलेल्या रूम मध्ये प्रशांत भोळे उर्फ पप्पु भोळे असल्याने तेथे गेलो. तेथे गेल्यानंतर मी त्याच्या कामासंबंधी चर्चा केली. खाजगी व्यक्ती प्रशांत (पप्पु) भोळे याला मी विचारले की, ''मला सांगा,तर ॲक्च्युली खरी गोष्ट सांगा,भाउसाहेबांचे कीती ॲक्च्युली खरी गोष्ट सांगा'' त्यावर खाजगी व्यक्ती भोळे यांनी मला सांगीतले की, ''२० रुपये भाउसाहेब,आणी साहेबांचे स्टार चे १००रुपये आणी ज्युनिअर चे ५०रुपये असे १७० रुपये आणी आपला पोरगा फी घेतो ३० रुपये'' या प्रमाणे सहया घेवून काम करून देण्यासाठी खाजगी व्यक्ती प्रशांत (पप्पु) भोळे याने माझेकडे २००/- रू. लाचेची रक्कम मागीतली. त्यानंतर मी खाजगी व्यक्ती भोळे यांने सांगीतल्याप्रमाणे ओनरशीप ट्रान्सफरचे पेपर देण्यासाठी अकील याचेकडे गेलो. अकील याचेकडे कागदपत्रे देवून ''ये पेपर तुम्हारे तरफ देणे को बोला है'' असे सांगीतले असता अकीलने ''हा रहणे दोना'' त्यावर मी स्वतःहून त्याला सांगीतले की, ''इसके पैसे बादमे मिलणे वाले है, अभी रखलो बादमे देखना ... चला अकील भाई'' त्यानंतर अकीलने कागदपत्रे ताब्यात घेवून ''हा हा हो जायेगा ,हो जायेगा टेन्शन मत लो'' असे सांगीतले. त्यानंतर मी व पंच श्री.जाधव असे माझे कडे असलेल्या स्कुटरवर तेथुन निघुन पोलीस

रामानंदनगर पो स्टे CCTNS-302/2021 दि.-17 at 12:39 वा दाखल

समक्ष

गणेश कौतीकराव ढेंगे

निरीक्षक श्री.साळुंखे साहेब व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. मला व माझे सोबतचे पंच श्री.जाधव यांना घडलेली हकीकत विचारली असता आम्ही वरील प्रमाणेची हकीकत सांगीतली.

त्यानंतर पोनि श्री.साळुंखे यांचे सूचने प्रमाणे मी दोन्ही पंचासमक्ष लोकसेवक यांना द्यावयाची लाचेची रक्कम २००/- रूपये त्यात १०० रुपये दराच्या २ चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांना अ.पा. लावून त्या नोटा माझे शर्टचे खिशामध्ये ठेवून दिल्या नंतर मला व पंचाना पो.नि. श्री साळुंखे यांनी योग्य त्या सुचना दिल्या. वरील प्रमाणे केलेल्या कारवाई बाबतचा सविस्तर पडताळणी/सापळापूर्व पंचनामा करण्यात आला.

पडताळणी व सापळा पूर्व पंचनामा संपल्यानंतर वाहन हस्तांतरणाच्या कागदपत्रावर जळगाव येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील सहया घेवून काम करून देण्यासाठी खाजगी व्यक्ती प्रशांत (पप्पु) भोळे यांना लाचेची रक्कम देण्यासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगाव येथे जाणे असल्याने मला व पंच नं१ श्री जाधव आम्हाला श्री साळुंखे साहेब यांनी योग्य त्या सूचना देवून लाचेची रक्कम, व्हाईस रेकॉर्डर सह माझेकडील स्कुटरने रवाना करून आमचे पाठोपाठ पोनि.श्री.साळुंखे, पंच नं.२ श्री नागरे, सापळा पथकातिल सदस्य त्यांचेकडील वाहनाने उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगाव येथे येवून सापळा आयोजित केला. परंतु तेथे माझी व खाजगी व्यक्ती प्रशांत (पप्पु) भोळे याची भेट झाली नाही. त्यानंतर मी पोनि.श्री.साळुंखे यांना सांगीतले की, मी दिनांक १२/१०/२०२१ रोजी सकाळी १२.३० वा.चे सुमारास पुन्हा उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगाव येथे प्रशांत उर्फ पप्पु भोळे याची भेट घेण्यासाठी जाणार आहे. त्याकरीता पुढील कार्यवाही दि.१२/१०/२०२१ रोजी आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरले. त्याबाबत सविस्तर सापळा कारवाई स्थगीती पंचनामा करण्यात आला.

मला खाजगी व्यक्ती प्रशांत (पप्पु) भोळे यांना लाचेची रक्कम देण्यासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगाव येथे जाणे असल्याने दि.१२/१०/२०२१ रोजी १२.०० वा. ठरल्या प्रमाणे भेट झाल्यावर मला व पंच नं१ श्री जाधव अशांना श्री साळुंखे साहेब यांनी पुन्हा योग्य त्या सूचना दिल्या.

पोनि.श्री.साळुंखे यांनी दि.१२/१०/२०२१ रोजी सापळा आयोजीत करून माझेकडे अ.पा.लावलेली २००/- लाचेची रक्कम देवून, व्हाईस रेकॉर्डर सह माझेकडील स्कुटरने रवाना करून आमचे पाठोपाठ पोनि.श्री.साळुंखे, पंच नं.२ श्री नागरे, सापळा पथकातिल सदस्य त्यांचेकडील वाहनाने उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगाव येथे येवून सापळा आयोजित केला. परंतु तेथे माझी व खाजगी व्यक्ती प्रशांत (पप्पु) भोळे याची भेट झाली नाही. उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे आवारात असलेल्या माझे ओळखीच्या लोकांशी झालेल्या संभाषणावरून माझी खात्री झाली की, खाजगी व्यक्ती प्रशांत उर्फ पप्पु भोळे याला संशय आलेला असून तो आता माझेकडून पैसे घेणार नाही. त्यामुळे आता ही कार्यवाही थांबवून प्रशांत उर्फ पप्पु भोळे याने माझेकडून उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगाव येथील अधिकारी श्री.शाम शिवाजीराव लोही यांचा खाजगी व्यक्ती म्हणून २००/- रू. लाचेची मागणी केली असल्याने त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी असे सांगीतले. त्यानुसार सापळा कारवाई स्थगीत करण्यात आली त्याचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

मी दि.११/१०/२०२१ रोजी दिलेल्या तक्रारीवरून जळगाव उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे आवारात झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान खाजगी व्यक्ती प्रशांत जगन्नाथ भोळे उर्फ पप्पु भोळे, रा.जे.के.मोटार ड्रायव्हींग स्कुल, जामनेररोड, भुसावळ जि.जळगाव याने उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगाव येथील अधिकारी व कर्मचारी यांची सही घेवून एमएच १९ सीसी ७७०० या ॲक्टीव्हा गाडीचे वाहन हस्तांतरणाचे काम करून देण्याकरीता माझेकडून दि.११/१०/२०२१ रोजी १३.२४ ते १३.४३ वा. चे दरम्यान पंच साक्षीदार यांचे समक्ष २००/- रू.लाचेची रक्कम मागणी करून मिळविण्याचा प्रयत्न केला आहे.

तरी खाजगी व्यक्ती प्रशांत जगन्नाथ भोळे उर्फ पप्पु भोळे, रा.जे.के.मोटार ड्रायव्हींग स्कुल, जामनेररोड, भुसावळ जि.जळगाव याने भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने माझेवर उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगाव कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे ओळखीचा प्रभाव पाडून पैशांच्या स्वरूपात लाभ मिळविण्याची व्यवस्था करून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले म्हणून माझी त्यांचे विरूध्द फिर्याद आहे.

माझी वरील संगणीकृत फिर्याद मी वाचून पाहीली ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

11633

पोलीस ठाणे अंमलदार
रामानंद नगर पो.स्टे.जळगाव